**<u>ठळक बातम्या</u>**

- रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर जैसे थे, महागाई दराचा अंदाज आणखी घटवला

- सामाजिक न्याय विभाग २५ हजार विद्यार्थ्यांसाठी राज्यात १२० ठिकाणी उच्च दर्जाची वसतिगृह उभारणार

- दिव्यांगांसाठी समर्पित क्रीडांगण तयार करण्याचं राज्य सरकारचं आश्वासन

**आणि**

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका VVPAT सह किंवा मतपत्रिकांद्वारे घेण्याची काँग्रेसचे मागणी

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं पतधोरण आढाव्यानंतर व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळं रेपो दर साडे ५ टक्क्यांवर कायम राहणार आहे. याशिवाय इतरही दर जैसे थे राहणार आहे.

चालू आर्थिक वर्षात महागाई दर आणखी कमी होऊन ३ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले. जूनमध्ये वर्तवलेल्या अंदाजात हा दर ३ पूर्णांक ७ दशांश टक्के राहील, असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं होतं. खाद्यपदार्थांच्या दरात होत असलेली घसरण, शेती क्षेत्रात झालेल्या सुधारणा यामुळं महागाई दराचा अंदाज कमी केल्याचं ते म्हणाले. आर्थिक वृद्धी दर साडे ६ टक्क्यांवर कायम राहील, असंही गव्हर्नर म्हणाले.

जुलै ते सप्टेंबर दरम्यान रिझर्व्ह बँक सर्व ग्रामपंचायतीमध्ये मेळावे आयोजित करणार आहेत. यात बँक खाती उघडणं, पुन्हा केवायसी करणे, वीमा आणि निवृत्ती वेतन योजना यासारख्या सुविधा मिळतील, अशी माहिती गव्हर्नरांनी दिली. खाते धारकाचा मृत्यू झाल्यावर त्यांच्या बँकेतल्या लॉकरमधल्या वस्तू वारसांना

सुलभरितीने काढता याव्यात याची प्रक्रीया आणखी सुलभ आणि सोपी करणार असल्याचं ते म्हणाले. सर्वसामान्य नागरिकांना SIP च्या माध्यमातून ट्रेझरी बिलमध्ये गुंतवणूक करण्याची सुविधाही लवकर उपलब्ध करुन देऊ, असं गव्हर्नरांनी सांगितलं.

<><><><><>

राज्याच्या सामाजिक न्याय विभागानं विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाची वसतिगृहं उभारण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यभरात एकूण १२० ठिकाणी ही वसतिगृहं उभारली जाणार असून, यामुळे सुमारे २५ हजार विद्यार्थ्यांना निवासी सुविधा उपलब्ध होणार आहेत. वसतिगृहासाठी शासनानं १ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचं सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितलं.

मुंबईत चेंबूरमध्ये शासकीय वसतिगृहाच्या नूतन इमारतींच्या उदघाट्न प्रसंगी ते बोलत होते.

<><><><><>

दिव्यांग खेळांना प्रोत्साहन आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या सहकार्यानं राज्यात दिव्यांगांना समर्पित क्रीडांगण तयार केलं जाईल, असं दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितलं. ते मुंबई विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय जलतरण स्पर्धा २०२५ च्या पारितोषिक वितरण सोहळ्यात बोलत होते. राज्यातल्या दिव्यांगांच्या शाळांमध्ये सर्व उपकरणांसह ओपन जिम ची सुविधा दिली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

दिव्यांग बांधवांच्या प्रगतीनेच भारताला २०४७ पर्यंत विकसित देश बनवण्याचं स्वप्न पूर्ण करता येईल, असं राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यावेळी म्हणाले.

<><><><><>

विद्यार्थ्यांना बालवयापासून शिस्त लागावी आणि त्यांच्या मनात देशाविषयी आदर निर्माण व्हावा, यासाठी एनसीसीच्या धर्तीवर प्रशिक्षण देण्याचा विचार असल्याचं शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितलं. मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. राज्यातल्या अधिकाधिक विद्यार्थ्यांना एनसीसीचं प्रशिक्षण मिळावं यासाठी राज्यातली एनसीसीची प्रशिक्षण केंद्र वाढवून मिळावीत, तसंच अधिकाधिक शाळांमधल्या विद्यार्थी त्यात सहभागी व्हावेत, यासाठी केंद्र सरकारकडे प्रयत्न केले जातील, असं भुसे यांनी सांगितलं.

विद्यार्थ्यांना देशाविषयी आदर निर्माण व्हावा, यासाठी यावर्षी स्वातंत्र्यदिन समारंभात देशभक्तीपर गीतांवर कवायती सादर केल्या जाणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत शिवसेनेचा पाठिंबा भाजपाप्रणीत एनडीए, अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीला आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. शिवसेनेच्या सर्व खासदारांसह अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही महायुती म्हणूनच लढणार, असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या ५ ज्योतिर्लिंगाच्या विकास आराखड्यांची प्रभावी आणि वेगवान अंमलबजावणी व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार पाच वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
हे अधिकारी संबंधित ज्योतिर्लिंगांच्या विकास कामांचा नियमित आढावा घेऊन, त्याचा अहवाल मुख्यमंत्र्याना सादर करतील.

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका VVPAT मशिनवरच घ्यावात, ते शक्य नसेल तर मतदान पत्रिकेवर घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. एका प्रभागात जास्त उमेदवार असणार, मतदारांना एकावेळी चार मतं द्यावी लागणार, त्यामुळे प्रक्रियेला वेळ लागेल, असं कारण देत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत VVPAT मशीन नसणार अस राज्य निवडणूक आयोग सांगत आहे, मात्र निवडणुका पारदर्शक पद्धतीनं होण्यासाठी VVPAT ची आवश्यकता आहे. आपण कुणाला मत दिलं हे मतदारांना कळलंच पाहिजे, असं वडेट्टीवीर म्हणाले.

**<><><><><>**

उत्तराखंडमधल्या उत्तरकाशी जिल्ह्यातल्या पूरग्रस्त भागात बचावपथकं मदत आणि बचावकार्य राबवत आहेत. आतापर्यंत १३५ जणांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं असून त्यांच्यासाठी अन्न, पाणी आणि औषधाची सोय करण्यात आली आहे.

उत्तराखंडमधे महाराष्ट्रातल्या ५१ नागरिक अडकले आहेत. यात नांदेडचे अकरा, सोलापूरचे चार आणि इतर जिल्ह्यांतल्या नागरिकांचा समावेश आहे. त्यांचा नातेवाईकांशी संपर्क झाला असून ते सुखरूप असल्याचं राज्य आपत्कालीन कार्य केंद्रानं म्हटलं आहे.

तिथं अडकलेल्या **सोलापूरच्या** नागरिकांपेकी विठ्ठल पुजारी यांनी व्हिडिओ करून आपल्या नातेवाईकांसाठी पाठवला आहे. आम्ही सुखरूप असून लवकरच परत येऊ, असं त्यांनी म्हटलं आहे….

**होल्ड - बाईट - विठ्ठल पुजारी**

**<><><><><>**

मराठा आणि कुणबी एकच असून याबाबतचा निर्णय सरकारनं तातडीने घ्यावा अन्यथा पुन्हा मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

**<><><><>**

पुणे विमानतळावर सीमाशुल्क विभागाने केलेल्या कारवाईत ६ किलो ११९ ग्रॅम अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या अंमली पदार्थांची आंतरराष्ट्रीय बाजारातली किंमत अंदाजे ६ कोटी रुपये इतकी आहे. बँकाकहून पुण्यात आलेल्या एका प्रवाशाच्या बॅगेत हे अंमली पदार्थ आढळून आले. दरम्यान, अन्य एका प्रकरणात पुणे पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकानं साडे ५ लाख रुपये किमतीचे २७ किलो अंमली पदार्थ जप्त केले असून एका व्यक्तिला अटक केली आहे.

**<><><><>**

आरोग्य, शिक्षण, शेती यासोबत तंत्रज्ञानावर आधारित विविध महत्त्वाच्या सोयीसुविधांनी सुसज्ज असणारं देशातलं पहिलं स्मार्ट गाव म्हणून नागपूरमधलं सातनवरी गाव तयार होत आहे. या प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस येत्या ८ तारखेला या गावाला भेट देत आहेत. केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत कंपन्यांच्या संघटनांसोबत अशा प्रकारचं स्मार्ट गाव विकसित करण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांसमोर ठेवला होता.

**<><><><>**

**सोलापूर** शहर आणि जिल्ह्यात गेले २ दिवस जोरदार पाऊस झाल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक ठिकाणी पूर सदृष्य परिस्थिती निर्माण झाली असून काही गावांचा सपर्क तुटला आहे. शहरात काही ठिकाणी घरांची पडझड झाली तर काही ठिकाणी झाडं उन्मळून पडली. बाळे परिसरातल्या घरांमध्ये पावसाचं पाणी

शिरलं आहे. शेतात पाणी साचल्यानं  उडीद, भूईमूग, सोयाबीन, मका अशा पीकांना धोका निर्माण झाला आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आज पहाटेपासूनच पावसाचा जोर वाढला असून सर्वच तालुक्यात संततधार पाऊस सुरु आहे. सायंकाळी पावसानं काहीशी विश्रांती घेतली. पावसामुळे जिल्ह्यातल्या तेरेखोल, कर्ली, गडनदी, तिलारी, वाघोटन या नद्यांच्या पातळीत वाढ झाली आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**